वाचले :-

१) शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७.
२) आदेश क्रमांक साप्रवि/३/कावि/२८६/२०२४, दि.२३/०१/२०२४
३) बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियत्रंण विभाग यांचेकडील पत्र क्र. बीपी/०१/कावि/६५४/२०२४, दि.२६/०६/२०२४
४) श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, यांचा दि. २१/०६/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
५) मा. आयुक्त यांचेकडील दिनांक ०८/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/६७/२०२४
दिनांक ०९/०७/२०२४

**विषय** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूरीबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु. १९९००-६३२०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमतः ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. निर्गत नियुक्ती आदेशातील उमेदवार मनपा सेवेत रुजू झालेले आहेत. तथापि श्री.पाटील योगेश सदाशिव यांनी महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्री.पाटील योगेश सदाशिव यांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण, मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक व एकुण सेवा | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १९/०४/२०२४ | दि.२१/०६/२०२४, ( २ महिने २ दिवस) | C/५२९ दि. २१/०६/२०२४ अन्वये र.र. १९,९००/- | जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन येथे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर निवड |

श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन येथे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर निवड झाल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. संबंधित विभागप्रमुखांनी श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज व वैद्यकीय अग्रिम येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा राजीनामा मंजूरीबावत स्पष्टपणे शिफारस केली आहे. श्री.पाटील योगेश सदाशिव यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात मुळ वेतन भरल्याची पावती त्यांच्या अर्जासोवत सादर केली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २ डिसेंबर १९९७ मधील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा दि.२१/०६/२०२४ पासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करुन महापालिका सेवेचा राजीनामा आदेशाच्या तारखेपासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती संबंधित कर्मचा-यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति - श्री.पाटील योगेश सदाशिव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
प्रत -
१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार ४. माहिती व जनसंपर्क विभाग
५.कामगार कल्याण विभाग ७.साप्रवि टेबल क्र. ७,८,१०,११,१२,१४, संग.कक्ष (साप्रवि)
८. बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियत्रंण विभाग
९.सर्व संबंधित विभाग ६.माहिती तंत्रज्ञान विभाग

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका